५८

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७
ई-मेल—desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्रमांक :- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ ९८०
दिनांक :- १५/०६/२०२३

प्रति,
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

विषय : **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबत ........ (मुदतवाढ)**

संदर्भ :
१. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २२७ दि.२४/०८/२०२२
२. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २४४ दि.२९/०९/२०२२
३. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ २७० दि.०१/११/२०२२
४. तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांची विभागीय कार्यालयांसोबतची दूरदृष्य बैठक दि.२९, ३०/११/२०२२
५. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ ०५ दि.११/०१/२०२३
६. मा.प्र.संचालक तंत्रशिक्षण, मुंबई म.रा.यांची विभागीय सहसंचालकांसोबत बैठक दि.१३/०२/२०२३
७. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/ ३७ दि.१४/०२/२०२३
८. या संचालनालयाचे पत्र क्र:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२२-२३/१४० दि. ११/ ०५/२०२३

उपरोक्त १ व २ च्या संदर्भीय पत्रान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत सर्व विभागीय कार्यालयांमार्फत त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना, डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी Institute Profile अद्ययावत करण्याबाबत व विद्यार्थ्यांना अर्ज मुदतीच्या आत भरण्यासाठी कळविण्यात आलेले होते.

संदर्भ क्र.८ च्या पत्रान्वये, **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता** विद्यार्थ्यांना डीबीटी पोर्टलवर अर्ज भरण्यासाठी तसेच **शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता** ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना Re-apply करण्यासाठी **दि.३१/०५/२०२३** पर्यंत मुदत देण्यात आल्याचे कळविण्यात आले होते. आता डीबीटी पोर्टलच्या सोबत जोडलेल्या स्क्रीन शॉटनुसार, सदर मुदत पुनश्च वाढवून **दि.३०/०६/२०२३** पर्यंत देण्यात आलेली आहे.

तरी, सर्व विभागीय कार्यालयांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिनस्त येणाऱ्या सर्व संस्थांना मुदतवाढीबाबत सूचित करण्यात यावे व संदर्भ क्र.८ च्या पत्रामध्ये दिलेल्या सुचनानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच भविष्यात डीबीटी पोर्टलवर प्रलंबित अर्जावरील कार्यवाही ही डीबीटी पोर्टलवर दर्शविल्या जाणाऱ्या अंतिम मुदतीपूर्वी करण्याबाबत कळविण्यात यावे. जेणेकरुन अंतिम मुदतीपर्यंत कोणताही अर्ज प्रलंबित राहणार नाही.

(डॉ. धनपाल कांबळे)
उपसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

**प्रत :: यांना माहितीसाठी सविनय सादर.**
१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
२) मा.सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय विस्तार भवन, ७ वा मजला, मुंबई-३२(लक्षवेध:श्री.कदम, कक्ष अधिकारी)



---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२३/ २५९९
दिनांक:- 16 JUN 2023

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या कार्यवाहीबाबतचे (मुदतवाढ), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करून दिलेल्या सुचनांप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- संदर्भिय पत्र

(उमेश नागदेवे)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : - या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.